दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २८७ वा | शनिवार दि. १२ ऑगस्ट २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६


## नवाब मलिकांना जामीन मंजूर, सुप्रीम कोर्टाकडून दिलासा



**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री नवाब मलिक यांना अखेर जामीन मंजूर झाला आहे. सुप्रीम कोर्टाने मलिकांना दिलासा देताना दोन महिन्यांसाठी जामीन मंजूर केला. प्रकृतीचं कारण देत वैद्यकीय जामीन मिळावा अशी याचिका नवाब मलिक यांनी केली होती. मलिकांची ही मागणी सुप्रीम कोर्टाने मान्य केली. मनी लाँडरिंग प्रकरणात नवाब मलिक फेब्रुवारी २०२२ पासून तुरुंगात आहेत. नवाब मलिक हे फेब्रुवारी २०२२ पासून म्हणजेच जवळपास दीड वर्षांपासून कारावासात होते.


# पोस्टर फाडल्याने दंगल; दोन गटात तुफान दगडफेक


## जाळपोळीचा प्रयत्न । २०० जणांविरुद्ध गुन्हा । २१ पोलीस जखमी

**शिरपूर । प्रतिनिधी**

धुळ्यातील शिरपूर तालुक्यातील चरण पाडा येथे बॅनर फाडल्याच्या कारणावरून दोन गटात बाचाबाची झाली. वाद इतका विकोपाला गेला की, दोन्ही गटातील लोकांनी एकमेकांवर दगडफेक सुरू केली. यावेळी संतप्त जमावाने मध्यस्थी करण्यासाठी आलेले भाजप आमदार काशीराम पावरा यांचे वाहन देखील फोडले. या घटनेमध्ये आमदार काशीराम पावरा थोड्यावत बचावले असून जमावाला नियंत्रित करण्यासाठी पोलीस प्रशासनातर्फे एसआरपीएफ पथकाला पाचारण करण्यास आले. या पथकातर्फे रात्री उशिरापर्यंत हा तनाव दूर करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करण्यात आले. आता या ठिकाणी परिस्थिती आटोक्यात आली असून सध्या परिसरात तणापूर्ण शांतता आहे.

क्षणार्धात या वादाचे रूपांतर दगडफेकीत झाले. वाद इतका विकोपाला गेला, की दोन्ही गटातील हजारो लोक मध्यरात्रीच्या सुमारास रस्त्यावर उतरले. यावेळी संतप्त जमावाने मुंबई-आग्रा महामार्ग रोखून धरला. यादरम्यान जमावाची समजूत काढण्यासाठी गेलेले भाजपचे स्थानिक आमदार काशीराम पावरा यांचे वाहन देखील संतप्त जमावाने फोडले. इतकंच नाही, तर पोलिसांची व्हॅन देखील फोडण्यात आली. या घटनेमध्ये आमदार काशीराम पावरा बचावल्याची माहिती आहे. दरम्यान, परिस्थिती हातबाहेर जात असल्याचं लक्षात येताच, पोलिसांतर्फे एसआरपीएफच्या पथकाला पाचारण करण्यात आले. रात्री उशीरापर्यंत पथकातर्फे तणाव दूर करण्याचे प्रयत्न सुरू होते. सध्या परिस्थिती आटोक्यात आली असून परिसरात तणावपूर्ण शांतता आहे. या घटनेत दोन्ही गटातील ५ ते ६ जण जखमी देखील झाले आहे. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून पोलिसांनी दगडफेक तसंच आंदोलन करणाऱ्या काही आंदोलकांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे.



### आमदारांसह तहसीलदारांच्या गाडीवर दगडफेक

दोन गटात झालेल्या दंगलीवर नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हाभरातील पोलिसांचा फौजफाटा सांगवीत दाखल झाला. दंगलीची पाहणी केल्यानंतर आमदार काशीराम पावरा, पोलिस अधीक्षक संजय बारकुंड, तहसीलदार महेंद्र माळी शांतता प्रस्थापित करण्यासाठी समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत असताना अचानक एका बाजूने दगडफेक सुरू झाली. दगडफेकीत आमदार काशीराम पावरा आणि तहसीलदार महेंद्र माळी यांच्या गाड्यांच्या काचा फुटल्या.

### जोयदा फाट्यावर लावले होते बॅनर!

सांगवी गावातील जोयदा फाट्यावरील एका शाळेजवळ आदिवासी समाजातर्फे आदिवासी दिनाचे एक बॅनर लावण्यात आले होते. दुपारी चार वाजेच्या सुमारास कोणत्यातरी समाजकंटकाने हे बॅनर फाडले. हे बॅनर चारण समाजातील (काठीयावाड) लोकांनी फाडले असावे, असा संशय घेवून आदिवासी समाजाच्या गटाने चारण समाजाच्या गटाशी वाद घातला. या वादाचे पर्यवसन हाणामारीत झाले. या घटनेचे पडसाद संपूर्ण गावात उमटले. दोन्ही गटांकडून एकमेकांवर तुफान दगडफेक करण्यात आली. रात्री उशीरापर्यंत हा प्रकार सुरु होता. यामुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



### प्रकार दुर्दैवी!

सांगवीत जो प्रकार घडला, तो अतिशय दुर्दैवी आहे. शिरपुर तालुक्याकडे शांतताप्रिय म्हणून बघितले जाते. परंतु, काही समाजकंटकांनी जाणीवपूर्वक सदर प्रकार घडवून आणला. अशी घटना यापुढे व्हायला नको. कारण अशाने कुठलाही विकास होवू शकत नाही. शिरपूर तालुक्यात जी विकासकामे होत आहेत, तशी कामे कुठेही झालेली नाहीत. जे काही आदिवासी पाडे राहीले असतील तिथेही विकासकामे करण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे विकास झालेला नाही, असे दाखविण्याचा प्रयत्न कोणी करु नये. तसेच भविष्यात अशी घटना घडणार नाही, याची दक्षता आदिवासी युवकांनी घ्यावी. -आ.काशिराम पावरा, शिरपूर

### सुमारे २०० जणांविरुध्द गुन्हा

शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे असई रामकृष्ण मोरे यांच्या फिर्यादीवरुन, साहेबराव सिताराम कोकणी,भगवान नामदेव कोळी, विक्की प्रकाश कोकणी, राजू जगन कोकणी, उत्तम कोकणी, अशोक रामचंद्र कोकणी, हिम्मत विष्णु भोई, छोटु भोपडे कोकणी, केशव कोकणी इतर १४० ते १५० जणांवर भादंवि कलम ३५३, ३०७ वगैरे प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणी आतापर्यंत १३ जणांना ताब्यात घेतले आहे.

### अधिकारी तळ ठोकून

एसपी संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, डीवायएसपी सचिन हिरे, एलसीबी पीआय हेमंत पाटील, पीआय अंन्साराम आगरकर, सपोनि जयेश खलाणे आदि १७ अधिकारी व २०० पोलीस जवान गावात तळ ठोकून होते. गावात एसआरपीएफ पथकाकडून बंदोबस्त तैनात करण्यात आला असून तणावपूर्ण शांतता आहे. दरम्यान, गावात रुटमार्च काढून शांततेचे आवाहन करणार असल्याची माहिती एसपी संजय बारकुंड यांनी दिली.

### २१ पोलीस कर्मचारी जखमी

दोन्ही गटातील शेकडो लोकांचा जमाव रस्त्यावर उतरल्याने व परिस्थिती नियंत्रणात येत नसल्याने अखेर पोलिसांना बळाचा वापर करावा लागला. मात्र, संतप्त जमावाने पोलिसांवरच दगडफेक करुन हल्लाबोल केला. या हल्ल्यात तब्बल २१ पोलीस अधिकारी व कर्मचारी जखमी झाले. यात दोंडाईचा पोलीस ठाण्याचे पोनि श्रीराम पवार, शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे सपोनि जयेश खलाणे, थाळनेर पोलीस ठाण्याचे दिपक पावरा, सोनगीर पोलीस ठाण्याचे गणेश फड, शिरपूर पोलीस ठाण्याचे नरेंद्र पवार, चालक पोहेकॉ.कैलास ढोले, पोना. रविंद्रकुमार राठोड, पोकॉ.जयेश भागवत, मुक्तार शहा, विशाल लोंढे, पोना प्रविण अमृतकर, पोकॉ निखील काटकर, चाअसई संजय गुजराथी, पोहेकॉ संजय जाधव, पोकॉ भूषण वाडिले, सोनगीर पोलीस ठाण्याचे असई विजयसिंग पाटील,शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोकॉ मनोज नेरकर, दोंडाईचा पोलीस ठाण्याचे पोना पंकज ठाकुर, शिरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोकॉ गोविंद कोळी, पोना संदीप ठाकरे, सोनगीर पोलीस ठाण्याचे पोकॉ विजय पाटील हे जखमी झाले. यावेळी पोलिसांनी अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडून जमाव पांगविण्याचा प्रयत्न केला.

## न्यूज कॉलम

### दोन धर्मात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न

**शिदखेडा ।** दोन समाजात तणाव निर्माण होईल अशा पद्धतीने व्हिडीओ प्रसारीत करणार्या तरुणाविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल झाला असून याप्रकरणी संबंधीत तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याबाबत शिंदखेडा येथील मोतिलाल हिरामण पवार (३२) रा.माळीवाडा यानीं पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, गावातीलच सलमान शेख मुख्तार शेख (१९) रा.इब्राहीम मोहल्ला या तरुणाने दोन समाजातधार्मिक तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने व्हिडीओ प्रसारीत केला म्हणून त्याच्याविरुद्ध शिंदखेडा पोलिसातफिर्याद दिली.

### पंचवीस हजारांचा मुद्देमाल लंपास

**धुळे ।** तालुक्यातील हेंद्रुण गावी घरफोडी होऊन त्यात रोकडसह सोन्याचांदीचे दागिने असा एकूण २५ हजारांचा ऐवज चोरीस गेल्याची फिर्याद मोहाडी पोलीसात दाखल झाली आहे. याबाबत श्रीकृष्ण जामसिंग राजपूत (४९) या किराणा म्हटले आहे की दि.५ ऑगस्टच्या रात्री त्यांचे बंद घर अज्ञात भामट्यांनी फोडून घरातील पंधरा हजार रुपयांची रोकड व सोन्या चांदीच्या दागिन्यांसह २५ हजारांचा ऐवज अज्ञात भामट्याने लांबवला आहे.

# कौशल्य विकास युनिव्हर्सिटी उभारण्याचा प्रस्ताव लवरकच मार्गी लावणार

### केंद्रीय मंत्री राणे यांची खा. गोडसे यांना ग्वाही

**नाशिक । प्रतिनिधी**

सुशिक्षित बेरोजगार तरूणांमध्ये कार्य कुशलता यावी, त्यांना कौशल्याचे शिक्षण मिळून ते उद्योग व्यवसाय करण्यास सक्षम व्हावे म्हणून नाशिक किंवा परिसरात कौशल्य विकास युनिव्हर्सिटीची निर्मिती करावी यासाठी खा. हेमंत गोडसे हे गेल्या काही वर्षांपासून प्रयत्नशील आहेत. त्र्यंबकेश्वर रोडवरील खादी ग्रामोद्योग केंद्राच्या जागेवर बारा बलुतेदार तसेच इतर समाजातील उद्योग व्यवसायात येऊ पाहणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांना कार्यकुशलतेचे शिक्षण आणि प्रशिक्षण मिळावे यासाठीच्या कौशल्य विकास युनिव्हर्सिटीचा प्रस्ताव मार्गी लावावा अशी आग्रही मागणी खा. गोडसे यांनी काल सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विभागाचे केंद्रिय मंत्री नारायण राणे यांच्याकडे केली आहे. दरम्यान सुशिक्षित बेरोजगारांविषयी तुमची तळमळ न्यायिक असून कौशल्य विकास युनिव्हर्सिटीचा प्रस्ताव लवकरच मार्गी लावणार असल्याची ग्वाही यावेळी ना. राणे यांनी खा. गोडसे यांना दिली आहे.

जिल्ह्यात मोठ्या संख्येने सुशिक्षित बेरोजगार आहेत. त्यांना कुशल शिक्षणाचे धडे मिळालेले नसल्याने त्यांना औद्योगिक क्षेत्रात रोजगार उपलब्ध होत नाहीत. अनेक सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या पारंपारिक तसेच इतर लघु उद्योग व्यवसायात येण्याची इच्छा आहे. मात्र उद्योग व्यवसायाच्या निगडीत उपयुक्त कुशलतेचे शिक्षण, प्रशिक्षण नसल्याने इच्छा असूनही त्यांना उद्योग व्यवसायात येण्याची भीती वाटते. त्यामुळे नाशिक शहर किंवा परिसरात कौशल्य विकास युनिव्हर्सिटी उभारण्यात यावी असा आग्रह सुशिक्षित बेरोजगारांकडून सतत खा. गोडसे यांच्याकडे होत होता. यातूनच त्र्यंबकेश्वर रोडवरील खादी ग्रामोद्योग केंद्राच्या जागेवर कौशल्य विकास युनिव्हर्सिटी उभारण्यासाठी खा. गोडसे प्रयत्नशील आहेत. यासाठी खा. गोडसे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचीही यापूर्वी भेट घेतली होती.

त्र्यंबकेश्वर रोडवरील खादी ग्रामोद्योग केंद्राची जवळपास दोनशे बासष्ट एकर जमीन वापराविना वर्षानुवर्षे पडून आहे. या जागेवर आंतराष्ट्रीय दर्जाची कौशल्य विकास युनिव्हर्सिटी उभारण्यात यावी अशी मागणी खा. गोडसे यांनी ना. राणे यांच्याकडे केली. समाजातील तळागळातील सुशिक्षित बेरोजगारांना उद्योग व्यवसायाचे कुशल शिक्षण, प्रशिक्षण मिळावे यासाठीची आपली तळमळ न्यायिक असून कौशल्य विकास युनिव्हर्सिटीचा प्रस्ताव लवकरच मार्गी लावणार असल्याची ग्वाही यावेळी ना. राणे यांनी खा. गोडसे यांना दिली आहे.

# सोनगीर गावालगत गावठी दारूचे अड्डे उद्ध्वस्त



**सोनगीर । प्रतिनिधी**

येथील गावालगत असलेल्या नाल्याकाठी काटेरी बाभळाच्या झाडा आड चालणारा गावठी दारू अड्डा सोनगीर पोलिसांनी उद्ध्वस्त केला आहे.

या ठिकाणी गावठी दारू बनवण्याचे सुमारे १३७०० रुपये किमतीचे साहित्य जप्त करण्यात आले असून एक जणा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई स. पो. नि. गणेश फड यांच्या मार्गदर्शनाखाली पो. हे. कॉ कुदरत सय्यद, ईश्वर सोनवणे, विजय पाटील, संजय जाधव यांनी केली आहे.

कारवाईमुळे परिसरातील अवैध हातभट्टी चालविणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, गावठी हातभट्ट्यांवर पोलिसांनी केलेल्या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे. आगामी काळात हातभट्टींवर कठोर कारवाई करण्याचा पोलिसांनी दिला आहे. गावठी दारूच्या सेवनाने गेल्या काही वर्षात शेकडो लोकांचा राज्यात बळी गेला आहे.

# नाशिक-मुंबई महामार्गाची डागडुजी अंतिम टप्प्यात



**मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने महामार्गाचे काम सुरू असून दोन दिवसात काम पूर्ण होईल. जोपर्यंत काम पूर्ण होत नाही तोपर्यंत वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या किरकोळ बाबींचा निपटारा करण्यात आला आहे. कट देखील बंद केले आहेत. वाहतूक कोंडी आताच्या घडीला होणार नाही याची परिपूर्ण काळजी घेतली आहे. अधिकाऱ्यांना तंबी दिली असून कुठल्याही प्रकारची कोंडी यापुढे रस्त्यावर दिसणार नाही यासाठी उपाययोजना सुरू आहेत. तसेच ट्रॅफिक पोलिस व वॉर्डन यांना देखील सूचना केल्या आहेत.**

**- दादा भुसे,** पालकमंत्री, नाशिक

### मंत्री दादा भुसेंच्या पाठपुराव्याला यश

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक-मुंबई रस्त्याची चाळण झाल्याने वाहन चालकांना त्रास सहन करावा लागत होता. अनेक ठिकाणी खड्डे पडल्याने वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात वाढली होती. यावर तातडीचा तोडगा काढण्याची सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांनी केली. यानुसार गेल्या आठवड्यात डागडुजीचे काम हाती घेतले असून हे काम अंतिम टप्प्यात आहे. यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

नाशिक-मुंबई हायवेवर वडपे ते ठाणे यादरम्यान वारंवार वाहतूक ठप्प होत असल्याने नाशिकहून मुंबईत पोचण्यासाठी तब्बल चार ते पाच तास लागत असल्याचा प्रवाशांच्या तक्रारी येत होत्या. या पार्श्वभूमीवर नाशिककरांसह भिवंडी, कल्याण व ठाणे येथील नागरिक, उद्योग व व्यावसायिकांच्या अडचणी लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी विविध उपाययोजना सांगितल्या. मंत्री भुसे यांनी स्वतः पाहणी करून वेळोवेळी पाठपुरावा केल्याने तूर्तास डागडुजीचे काम हे अंतिम टप्प्यात असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# शिक्षणानं समाजाचं नेतृत्व करावं : विद्यार्थ्यांनी एका कृतीतून उघडले समाजाचे डोळे

धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील सांगवी गावात गुरूवारी सायंकाळी एका समाजाचे बॅनर पाडण्याच्या कारणावरून मोठा वाद निर्माण झाला. या वादात दोन गट भिडल्यानंतर दोन्ही गटांकडून दगडफेक करण्यात आली. या घटनेनंतर गावात एकीकडे तणावचं वातावरण निर्माण झालेले असताना दुसरीकडे याच गावातील शाळा मात्र नियमितपणे भरल्याचं दिसून आलं. यामुळे शिक्षणानं समाजाचं नेतृत्व करावं अशी म्हण्याची वेळ आता निर्माण झाली आहे.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना मोठं पाऊल उचलावं लागलं. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रुधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. गावात अजूनही भीतीचे आणि तणावाचे वातावरण पाहायला मिळत आहे. दुसरीकडे याच गावात असलेली एक शाळा आज सकाळी नियमितपणे भरल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे शाळेत विद्यार्थ्यांची संख्याही लक्षणीय दिसून आली. यामुळे गावात काल झालेला दोन समाजातील वाद कुणामुळे झाला हा तपासाचा भाग झाला असला तरी दुसरीकडे मात्र विद्यार्थ्यांचे शाळेतील वातावरण दिलासादायक देणारे ठरले. ज्या दोन समाजातील नागरिकांनी एकत्र येत हा वाद वाढवला त्याच दोन समाजातील विद्यार्थी मात्र शाळेत गुण्यागोविंदाने शिक्षण घेत असल्याचे यावेळी पाहायला मिळाले. झालेला वाद हा तात्पुरत्या स्वरूपाचा असला तरी त्याचा परिणाम उद्याचे भवितव्य घडवणाऱ्या पिढीवर झालेला नाही, हेच या निमित्ताने दिसून आले. आणि यातून एक मोठा संदेश विद्यार्थ्यांनी समाजाला दिलेला आणि त्यातून सर्वांनी शिकण्याची गरज आहे.

### आपलं आकलन काय आहे?

**प्रश्न खरं तर हा आहे की समाजातल्या ह्या स्थित्यंतराचं आपलं आकलन काय आहे? आणि, ह्यापुढचा समाज कसा असावा ह्याबाबतची आपली दृष्टी काय आहे? समाज कसा असावा ह्याबाबतची आपली जशी दृष्टी असेल त्या अनुरूप तशी शिक्षणव्यवस्था आपल्याला लागेल. समाजाचं स्वरूप हे जसं त्याच्या मुळाशी असलेल्या आर्थिक संबंधांवर, अर्थव्यवस्थेवर अवलंबून असतं तसंच ते त्याची राजकीय, सांस्कृतिक, अध्यात्मिक अंगं आपली भूमिका कशी बजावतात ह्यावरही अवलंबून असतं. ह्याच बरोबर कुटुंबं, शासन, न्यायव्यवस्था ह्यासारख्या सामाजिक संस्थांचंही त्यात योगदान असतं. आणि, हे सगळं हलवतो, घडवतो माणूस. आणि, ह्या माणसाची जडणघडण शिक्षणातून होते. म्हणून शिक्षण, शिक्षणव्यवस्था समाजाची तब्येत टिकवण्याचं फार मूलभूत काम करते.**



### शिक्षणाचा हेतू काय?

**शिक्षणाचा हेतू माणसाला माणूस म्हणून घडवणं हा आहे. त्याला जीवनासाठी घडवणं, त्याच्या मनाची मशागत करणं हा आहे. असा माणूस की ज्याच्या मध्ये स्वावलंबी होण्याचं ज्ञान, आपल्या समाजाची काळजी करण्याचं सामर्थ्यही त्याच्यात आहे. माणसाला सर्वांगीण प्रगतीच्या वाटेनं नेण्याचं, शहाणं करण्याचं आणि व्यापक विचार करायला लावण्याचं काम शिक्षण करतं.**



शोध बातमी

**पुरुषोत्तम पाटील**
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०११११२६

# लहान मुलांच्या वादातून हल्ल्यात २ तरुणांचा मृत्यू

**नाशिक । प्रतिनिधी**

लहान मुलांना मारहाण करणाऱ्यांपासून सोडवण्यास गेलेल्या २ तरुणांवर जमावाने सशस्त्र हल्ला करत त्यांना गंभीर जखमी केल्याने त्यांचा उपचार सुरू असतानाच मृत्यू झाला. चुंचाळे शिवारातील संजीवनगर शिवारात गुरुवारी हा प्रकार घडला. संतप्त नातेवाइकांनी जखमींना जिल्हा रुग्णालयात आणले. मात्र, तेथे योग्य प्रतिसाद न मिळाल्याने मृतदेह पोलिस आयुक्तालयात नेल्याने तनाण निर्माण झाला होता. जिल्हा रुग्णालयात उपचार न मिळाल्याने मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाइकांनी केला आहे. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

पोलिसांनी दिलेली माहिती आणि प्रत्यक्षदर्शी इब्राहिम खान, रईस अली खान यांनी दिलेल्या माहितीनुसार, संजीवनगर येथे एका लहान मुलाला काही तरुण मारहाण करत होते. हा वाद सोडवण्यास मीराज खान, इब्राहिम शेख दोघे गेले. याचा राग आल्याने काही तरुणांनी दोघांना बेदम मारहाण केली. रिक्षामधून काही तरुण येथे आले व दोघांना घरात घुसून बाहेर काढून त्यांच्यावर शस्त्राने हल्ला केला. यात दोघे गंभीर जखमी झाले. दोघांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यांचा मृत्यू झाला.

## गुंडागर्दीचे आकर्षण का?

तरुणांचा देश अशी भारताची जगात ओळख आहे. याच युवापिढीच्या बळावर विश्वगुरु आणि जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न देशाने पाहिले आहे. तथापि तारुण्याच्या उंबरठ्यावरील पिढीच्या विश्वात भयंकर उलथापालथ सुरु असून गुंडागर्दी आणि तथाकथित भाईगिरीचे आकर्षण वाढत असल्याची भीती वाटावी अशा घटना अधूनमधून घडत आहेत. पहिली घटना चिखलीमधील. हातात कोयता घेऊन दहशत माजवली. दोघांवर वार केले. मोबाईल चोरले या आरोपाखाली पोलिसांनी अल्पवयीन मुलांना अटक केली.

दुसरी घटना कानपूरची. दोन वर्गमित्रांचे भांडण झाले. रागात एका मित्राने दुसऱ्या मित्राचा वर्गातच खून केला. आरोपी विद्यार्थी दप्तरात चाकू घेऊन आला होता असे पोलिसांनी सांगितले. तिसऱ्या घटनेत भुसावळमधील अकलूद येथील शाळेत एका विद्यार्थ्याच्या दप्तरात शिक्षकांना गावठी कट्टा सापडला होता. उत्तरप्रदेशातही अशीच एक घटना नुकतीच घडली. गंभीर गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग वाढत असल्याचे पोलिसांचे निरीक्षण आहे. ही गंभीर समस्या आहे. अडनिड्या वयातील मुलांमध्ये भाईगिरीचे आकर्षण का वाढत असावे? हातातील शस्त्र म्हणजेच ताकद आणि अशा मुलांना नेता म्हणून त्यांच्याच वयाच्या मुलांकडून मान्यता मिळते हा समज कसा पसरला? अभ्यास करून मोठे होण्याचे स्वप्न बघण्याच्या वयात मुले वर्गात गावठी कट्टा आणि चाकू घेऊन येण्याचे धाडस कसे करू शकतात? या समस्येचा बहुआयामी विचार करायला हवा. समाजमाध्यमे मुलांच्या खिशात मावतात. त्यांच्या वापराने स्वातंत्र्याची आणि खासगीपणाची चुकीची व्याख्या रूढ केली. समाजमान्य नसलेल्या गोष्टींना ग्लोरिफाय करणारा मजकूर आणि गुंडागर्दी हीच हिरोगिरी असा समज दृढ करणारा मजकुर समाजमाध्यमांवर धोधो पडत असतो.

अश्लीलतेचे खुलेआम प्रदर्शन केले जाते. काय पाहायचे हे ज्याचे त्याने ठरवायला हवे असे यावर म्हटले जाईल. तथापि अत्यंत संवेदनशील वयात मुलांना अशा अनेक गोष्टींचे आकर्षण वाटू शकते. समाजमाध्यमांवरील मजकुराचा व व्हिडिओचा विपरीत परिणाम मुलांच्या मनावर होतो हा अनेक सर्वेक्षणाचा निष्कर्ष आहे. मुलांचे पालकही आत्मचिंतन करतील का? मुलांचे दोन्ही पालक व्यस्त असतात. उदरनिर्वाहाच्या जबाब्दारीपोटी ते दोघेही दिवसाचा बराच काळ घराबाहेर असतात. त्याच वेळेत मुले घरी एकटी असतात. त्यांचा आणि मुलांचा संवाद हरवला आहे. ती पोकळी समाजमाध्यमे, ओटीटी प्लॅटफॉर्म किंवा मित्र भरून काढतात. त्यांचाच पगडा मुलांच्या मनावर बसतो. मुलांचे वर्तन बदलले तरी ते किती पालकांच्या लक्षात येते? तेवढा वेळ मुले आणि पालक एकमेकांना देतात का? शाळांमध्येही मूल्यशिक्षण फक्त एका तासापुरते मर्यादीत झाले आहे. अनेक प्रकारच्या बोज्यामुळे शिक्षकांना शिकवण्यास वेळ मिळत नाही. त्यांना शिकवू दयावे असे अभियान शिक्षकांनी मध्यंतरी राबवले. पठडीबद्ध अभ्यास घेण्यासच वेळ मिळत नसेल तर मुलांमधील वर्तनदोष शिक्षकांच्या लक्षात तरी कधी येणार? मुलांना क्रोध अनावर होतो. त्याचे नियमन शिकवले जाते का? क्रोध निर्माणच होऊ नये यासाठी देखील प्रयत्न व्हायला हवेत. या सामाजिक समस्येचा जाणत्यांनी समग्र विचार करून उपाययोजना सुचवायला हवी. तसे झाले नाही तर उभरत्या पिढीच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याचा धोका नाकारता येणार नाही.

## विकसित ग्रंथालयांमध्ये आदर्श पिढी घडविण्याची ताकद

पुस्तक हे माणसाचे सर्वोत्तम मित्र आणि योग्य सल्लागार असतात, जे ज्ञानाच्या प्रकाशाने आपल्या जीवनात मार्गदर्शकाच्या रूपात प्रगतीचा मार्ग अविरत दर्शवितात. दर्जेदार मनुष्यबळ आणि सुशिक्षित समाज निर्माण करण्यात ग्रंथालयाची भूमिका महत्त्वाची आहे. जगातील यशस्वी विचारवंतांच्या जीवनात पुस्तकांना विशेष स्थान असते, ते व्यस्त असतानाही पुस्तके वाचण्यासाठी वेळ काढतात. देशातील महान समाजसुधारक, क्रांतिकारक, महान शास्त्रज्ञापासून ते आजच्या नेत्यां-अभिनेत्यांनाही पुस्तके वाचायला आवडतात, बहुतेक लोकांनी स्वतः च्या संग्रहाची एक छोटी लायब्ररी आपल्या घरात बनवली आहे. माणसाचे चांगले जीवन चारित्र्य घडविण्यात पुस्तकांचे अमूल्य योगदान आहे. आजच्या आधुनिक युगात पुस्तकांनी डिजिटल रूप धारण केले आहे, म्हणजेच इंटरनेट आणि यांत्रिक साधनांच्या माध्यमातून जगातील साहित्य आपल्यापर्यंत पोहोचले आहे, जे आपण कधीही, कुठेही वाचू शकतो. ई-साहित्य ऑनलाइन लायब्ररीच्या स्वरूपात उपलब्ध आहे, परंतु ग्रंथालयात उपलब्ध दर्जेदार वाचन साहित्य संग्रहाची योग्य व्यवस्थापन आणि उत्तम सेवा सुविधा यातूनच ग्रंथालयाचा उद्देश पूर्ण होऊ शकतो.

आपल्या देशातील बहुसंख्य शाळेकरी मुलांना ग्रंथालयाची माहितीही नाही हे अतिशय खेदजनक आहे, कारण त्यांनी शालेय जीवनात ग्रंथालय पाहिलेले नाही. मागासलेल्या ग्रामीण भागाचीच ही अवस्था नसून, तर शहरे आणि महानगरातील अनेक शाळाही ग्रंथालयाविना सुरू आहेत. अनेक शाळांमध्ये तर देखाव्यासाठी एका बंद खोलीत काही रद्दी पुस्तकं लायब्ररीसारखी दिसतात, बहुतांश राज्यांतील शासकीय आणि अनुदानित शाळांमध्येही हीच परिस्थिती आहे. अशा स्थितीत विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचे मूल्य कसे समजणार? ही बाब गंभीर आहे. शालेय शिक्षण हा जीवनाचा आधारस्तंभ आहे, पाया चांगला असेल तर यशस्वी जीवनाची इमारत नक्कीच मजबूत होते.

आज समाजात ज्ञानाचे स्त्रोत म्हणून प्रस्थापित झालेली बहुतांश ग्रंथालये दुर्लक्षाला बळी पडत आहेत, त्यामुळे नवीन पिढी ग्रंथालयांकडे पाठ फिरवताना दिसत आहे. एक काळ असा होता की लहान मुलंही घरातील मोठ्यांसोबत बालसाहित्य वाचण्यासाठी जवळच्या सार्वजनिक ग्रंथालयात जायचे. मुलांमध्ये तो उत्साह, तळमळ, वाचनाचा आनंद आता दुर्मिळ होताना दिसतो, कारण मुले आता ऑनलाइन गेम्स, सोशल मीडिया, यात व्यस्त आहेत, जे त्यांना उद्या विनाशाकडे ढकलत आहे. जन्मापासूनच मुलांना मोबाईलचे व्यसन लावणारे आजचे बेजबाबदार पालकच, मोबाईलमुळे मुले बिघडली की तेच पालक संतापतात. ओल्या माती प्रमाणे, तुम्ही मुलांना जसे घडविता तशी ती मुले घडतात, तशी शिकतात. मातीचा एकदा आकार पक्का झाला की त्याचा पुन्हा आकार बदलणे कठीण असते. प्राथमिक शालेय शिक्षणापासूनच पालक आणि शिक्षकांनी मुलांना बालसाहित्य आणि वाचन साहित्याची ओळख करून देणे गरजेचं असते.

ऑनलाइनची ही बाजू देखील समजून घेणे आवश्यक : - मान्य आहे, ई-साहित्याने वाचकांसाठी एक नवीन मार्ग मोकळा केला आहे, परंतु यांत्रिक संसाधनांवर दीर्घकाळ सतत वाचन केल्याने थकवा येतो आणि कोरोना महामारीने ऑनलाइन अभ्यासाच्या नावाखाली विद्यार्थ्यांसमोर अनेक नवीन समस्या निर्माण केल्या, ते आपण बघितले. सतत यांत्रिक साधनांनी वेढलेले असल्याने विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचे व्यसन लागले आहे. शारिरीक व मानसिक दृष्ट्या मुले कमकुवत व हिंसक झाली, त्यांच्यात डोळ्यांच्या समस्या, चिडचिडेपणा, निद्रानाश, चिंता आणि गुदमरल्यासारखेपणा विकसित झाला. या समस्यांमुळे पालकही त्रासले. ई-साहित्य आपल्याला वेळ आणि पैशाची बचत करून जगभर पोहोचवते, परंतु आरोग्य तज्ञ म्हणतात की शक्य तितके कमी ऑनलाइन वाचणे चांगले आहे. प्रत्येकाने भरपूर पुस्तके वाचावीत, पुस्तके भौतिक स्वरूपात वाचणे सोयीस्कर व उत्तम आहे. पुस्तक हातात घेऊन किंवा भौतिक स्वरूपात वाचण्यात आपण जितका वेळ घालवतो, त्यातील निम्माही वेळ ऑनलाइन पुस्तक वाचण्यात घालवू शकत नाही. ऑनलाइन द्वारे ई-साहित्य मर्यादित कालावधीसाठी चांगले परिणाम देतात.

ग्रंथालय विकासापासून खूपच दूर :- आपल्या देशातील ग्रंथालयांचा विशेषतः सार्वजनिक ग्रंथालये आणि शालेय ग्रंथालयांचा विकास समाधानकारक नाही हे आपल्या सर्वांना माहीत आहे. योग्य व्यवस्थापन, कार्यक्षम कर्मचारी आणि आवश्यक निधीअभावी ग्रंथालयांची दुरवस्था झाली आहे. एक काळ असा होता जेव्हा ग्रंथालये ज्ञानाचा स्रोत म्हणून लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असायची. लोक कमी शिकलेले होते तरीही ग्रंथालयांचे महत्त्व त्यांना माहीत होते. आज तीच ग्रंथालये अमुल्य साहित्यासह मोडकळीस आलेल्या इमारतीत विध्वंसाची कहाणी सांगत आहेत. अनेक ग्रंथालयांमध्ये अमूल्य साहित्य जीर्ण अवस्थेत पडून आहे, तर अनेक ग्रंथालयांमध्ये साहित्याच्या नावाखाली काही वृत्तपत्रे दिसत आहेत. तज्ज्ञ कुशल मनुष्यबळाची तीव्र कमतरता आहे, त्यामुळे सेवा कोलमडत आहेत.

प्रशासनाचे दुर्लक्ष आणि उदासीनता :- देशात शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले जात असून आणि प्रत्येकजण ज्ञानाच्या स्त्रोतांची म्हणजेच ग्रंथालयाची उपयुक्तता स्वीकारतो पण ग्रंथालयांच्या विकासाचे काय? ग्रंथालयांच्या विकासात नव्या क्रांतीची आज सर्वाधिक गरज आहे, अशात आंतरराष्ट्रीय स्तराचे ग्रंथालयांचे जाळे पसरवणे तर दूरच, अस्तित्वात असलेली बहुतांश ग्रंथालये नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. आज मोठ्या शहरांतील महानगरपालिकेचे बजेट हजार कोटींहून अधिक आहे, पण ते ग्रंथालय विभागावर किती खर्च करतात, हे आपल्या सर्वांना माहीत आहे. बहुतांश राज्यांतील अनेक सरकारी शाळा, महाविद्यालयांमध्ये केवळ नावालाच ग्रंथालये आहेत. अनेक राज्यांतील सरकारी आणि अनुदानित शिक्षण केंद्रांच्या ग्रंथालय विभागात अनेक दशकांपासून कर्मचाऱ्यांची भरती होताना दिसली नाही. आज आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहोत, पण आजही आपण 'गावं तिथे ग्रंथालय' ही संकल्पना पूर्णतः साकार करू शकलो आहोत का? शाळेपासूनच ग्रंथालयांचे महत्त्व आणि उपयोगिता याला मुलांनी त्यांच्या जीवनात विशेष स्थान दिले पाहिजे. पण त्यांना शाळेत ग्रंथालयाची चांगली सेवा-सुविधा न मिळाल्यास ते ग्रंथालयापासून नक्कीच दूर होऊ लागतील. ग्रंथालयांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे, शिक्षणाला महत्त्व द्यायचे असेल तर प्रथम ग्रंथालये समृद्ध करावी लागतील. ग्रंथालये पैसे कमावण्याचे केंद्र नाहीत, कदाचित त्यामुळेच त्यांना महत्त्व मिळत नाही, पण या केंद्रांना ज्ञानाचे स्त्रोत म्हटले जाते, म्हणजेच देशाला समृद्ध, विकसित आणि परिपूर्ण करण्यासाठी ग्रंथालये अत्यंत महत्त्वाची आहेत. विकसित ग्रंथालयांमध्ये चांगली पिढी घडवण्याची ताकद असते. प्रशासनाची जबाबदारी :- केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक प्रशासन, संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या क्षेत्रातील सर्व ग्रंथालयांच्या विकासावर विशेष भर द्यावा. उत्कृष्ट वाचन साहित्य खरेदी, ग्रंथालय सेवा सुविधा, कुशल कर्मचाऱ्यांची भरती, ग्रंथालय इमारत बांधकामाचा विस्तार, याकडे लक्ष द्यावे. देशात ग्रंथालयात आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, पुरेसा निधी, कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षण आणि योग्य वेतनश्रेणी मिळणे आवश्यक आहे. ग्रंथालय विज्ञान क्षेत्रातील लाखो उच्चशिक्षित बेरोजगार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये साहित्य वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी स्थानिक प्रशासनापासून राज्य व केंद्र सरकारपर्यंत विविध स्तरांवर योजना, स्पर्धा, महोत्सव, कार्यक्रम, परिषदा आयोजित केल्या पाहिजेत. प्रत्येक जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाची ग्रंथालये स्थापन झाली पाहिजेत आणि त्याच्या क्षेत्रात येणाऱ्या सर्व गाव-शहरांतील शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयेही त्याला जोडली जावीत, जेणेकरून जिल्ह्यातील प्रत्येक वाचकाला आंतरराष्ट्रीय स्तरावरील ग्रंथालयीन सेवा जवळपास मिळू शकेल.

प्रत्येक शिक्षण केंद्रात सुसज्ज ग्रंथालय असल्यास :- देशात सर्वत्र विकसित ग्रंथालय असेल, तर मुले मोठ्या उत्साहाने ग्रंथालयाचा वापर करू शकतील. त्यांची पुस्तकांशी मैत्री होईल, पुस्तकं त्याच्या जीवनात योग्य मार्ग दाखवण्यासाठी उपयुक्त ठरतील, मुलेही त्यांच्या फावल्या वेळेचा देखील सदुपयोग करू शकतील. मुलांना अभ्यासात रस वाटेल, त्यांना कंटाळा येणार नाही. मोबाइल, सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग पासून ते दूर राहतील. मुलांच्या वाईट सवयी कमी होवून भविष्यात गुन्ह्यांना आळा बसेल. विद्यार्थी म्हणून, मुले त्यांच्या भविष्याबद्दल जागरूक आणि अपडेट राहतील, सुसंस्कृत, सर्जनशील आणि जबाबदार नागरिक बनतील. यामुळे शिक्षण व्यवस्था पूर्णपणे समृद्ध होईल आणि मुलं मोठी होऊन विविध क्षेत्रात काम करत असल्याने त्याचा थेट परिणाम इतर क्षेत्रांवर होईल. प्रगत राष्ट्र निर्माण करण्यात त्यांचा मोठा वाटा असेल. हळूहळू, आपलं संपूर्ण राष्ट्र जागतिक स्तरावर एक अग्रगण्य स्थान व्यापेल. आज जगातील त्या विकसित देशांच्या शिक्षण पद्धतीचा विचार करा, जिथे लहानपणापासूनच मुलांना ग्रंथालयांची ओळख करून दिली जाते आणि भविष्यात उंच झेप घेण्यासाठी पुस्तकाच्या रूपात नवे पंख लावले जातात. नक्कीच ही मुलं आयुष्यात यशाची पताका फडकवतात आणि देशाला प्रगतीच्या शिखरावर घेऊन जातात.



डॉ. प्रितम भी. गेडाम
मो.०८२३७४ १७०४१

**(राष्ट्रीय ग्रंथपाल दिन विशेष - १२ ऑगस्ट २०२३)**

## दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींमधील नवीन खेळाडू!

आरशा, आरशा सांग या जगात सगळ्यात सुंदर कोण? हा हिमगौरी आणि सात बुटके या गोष्टीतील जादुई आरशाला विचारलेला प्रश्न आपल्या सगळ्यांना परिचयाचा आहेच आणि आजही सांग दर्पणा कशी मी दिसते / दिसतो? हा प्रश्न रोज आपण नकळत आरशाला विचारतोच. आपण कसे दिसतो हे कुतूहल आणि त्यातूनच अगदी गोरेपान सुंदर असे नाही तर निदान प्रदर्शनीय किंवा टापटीप आपण दिसावे असे प्रत्येकाला थोड्याफार फरकाने वाटतेच. त्यामुळेच आपण रोज कमीत कमी एखादे तरी सौंदर्य प्रसाधन किंवा त्वचेची, केसांची स्वच्छता राखणारे उत्पादन (ब्युटी अँड पर्सनल केयर प्रॉडक्ट्स) वापरतो.

२०२० मधील कोरोना काळामुळे तर आपण वैयक्तिक स्वच्छतेबद्दल अधिक जागरूक झालो. साहजिकच आपण ही उत्पादने जास्त प्रमाणात वापरू लागलो. कोरोना काळात जागतिक व्यवहार बंद होते त्यामुळे लोकल उत्पादनांना वाव मिळाला. आयुर्वेदिक किंवा ऑरगॅनिक घटक असलेल्या उत्पदनाचा भाव वधारला. नवीन उत्पादक उदयास आले. सर्व व्यवहार घरून होत असल्यामुळे ऑनलाइन शॉपिंग आणि डिजिटल मार्केटिंगने जोम धरला. आजचे जग हे जाहिरातीचे युग म्हणूनच ओळखले जाते आणि जाहिरातदार, उत्पादक आपले उत्पादन ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी वेगवेगळे मार्ग अवलंबतात. त्यासाठी ग्राहकांच्या भावना आणि त्यानुसार असलेली त्यांची मानसिकता हा कळीचा मुद्दा असतो. हीच मेख ओळखून अतिशय चलाखीने उत्पादन ग्राहकाने घ्यावे म्हणून जाहिरातदार जाहिरात करतात आणि भावनेच्या भरात ग्राहक म्हणून आपण त्यास बळी पडतो. हे टाळण्यासाठी या नवीन डिजिटल मार्केटिंग जगताकडे डोळसपणे पाहावयास हवे.

नुकत्याच केल्या गेलेल्या अभ्यासानुसार भारतातील ब्युटी प्रॉडक्ट्सचे मार्केट ६.३% ने २०२७ पर्यंत वाढेल. ज्यामुळे या क्षेत्रात अनेक नवीन उत्पादकांची भर पडेल. साहजिकच या क्षेत्रातील जाहिरातीपण वाढतील. वाढते शहरीकरण, ग्राहकांची वाढलेली क्रयशक्ती, इंटरनेटचा वाढता वापर या सर्व कारणांमुळे उत्पादनांची मागणी वाढत जाणार आहे. या सगळ्यामुळे व्यापाराची पद्धतही बदलते आहे. सोशल मीडिया आणि ई-कॉमर्स यांच्यामुळे स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उत्पादक 'डायरेक्ट टू कस्टमर' या प्रकारे व्यापार करू पाहत आहेत. या सगळ्यात जाहिरात हा कळीचा मुद्दा ठरतो. तो कसा ते पाहू.

वर्तमानपत्रात किंवा दूरदर्शन संचावर जाहिरात देण्यासाठी खूप खर्च येतो. साहजिकच नवीन उत्पादकाला ते शक्य नसते त्यामुळे तो इतर सोशल मीडिया साईट्स वापरतो. इंस्टाग्राम, फेसबुक, ट्विटर, यू ट्यूब हे त्यातील आघाडीचे खेळाडू. जरा आठवून बघा बरं अलीकडे आपण किती वेळ यू ट्यूबवर घालवतो आणि किती जाहिराती आपसूकच बघतो. होते काय, काही अडले म्हणजे एखादी पाककृती हवी आहे, शेअर मार्केटची माहिती हवी आहे, एखादी कला शिकायची आहे, केशरचना किंवा मेकअप करायचा आहे की आपण यू ट्यूबची मदत घेतो. हळूहळू त्या विषयातील यू ट्यूबरला, ब्लॉगरला आपण अनुसारित करतो, थोडक्यात त्याच्या प्रभावाखाली येतो.


यालाच डिजिटल इन्फ्लुएन्सर असे म्हणतात. हे एक मोठे मार्केट आहे, ज्यात अनेकजण उत्तम पैसे कमावतात. ज्यांचे फॉलोअर्स जास्त त्यांना हे उत्पादक गाठतात आणि त्यांच्या उत्पादनाची जाहिरात करावयास सांगतात. तसे हे विश्व नवीन असल्यामुळे अशा प्लॅटफॉर्मवर जाहिरात कमी खर्चात होते, पण उत्पादनाची विश्वासार्हता याबद्दल मोठे प्रश्नचिन्ह असते. अनेकवेळा जाहिराती दिशाभूल करणाऱ्या, चुकीचे दावे करणाऱ्या असतात. पण अनेकजण केवळ ते फॉलो करत असलेला इन्फ्लुएन्सर ते उत्पादन वापरण्यास सांगत आहे म्हणून विकत घेतात. पण ते ब्युटी प्रसाधन त्याच्या त्वचेसाठी, केसांसाठी योग्य आहे का? याचा विचार होत नाही आणि फसगत होते. अशाप्रकारे होणाऱ्या जाहिरातींचे प्रमाण ४८.८ % इतके आहे आणि ते वाढतच जाणार आहे. त्यामुळे २०२१ साली Advertising Standards Council of India ने इन्फ्लुएन्सरसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

-डउख च्या रिपोर्टनुसार गेल्या दोन वर्षांत सौंदर्य प्रसाधनांच्या विरुद्ध येणाऱ्या तक्रारींमध्ये लक्षणीय वाढ झाली असून या क्षेत्राचा ३ नंबर लागतो. एकूण तक्रारींपैकी २४ % तक्रारी या क्षेत्रातील आहेत. त्यातील ९०.४% जाहिराती या बदलाव्या लागतात त्याचे मुख्य कारण दिशाभूल करणे हे असते. मुख्यत्वे या जाहिराती उत्पादनांची कामगिरी, उत्पादनाच्या केलेल्या टेस्ट्स त्यांचे निष्कर्ष, घटकांची परिमाणकारकता, तज्ज्ञांचे मत, सर्वेक्षण नमूद करत नाहीत. तसेच जाहिराती दावा करतात की त्यांचे उत्पादन ऑरगॅनिक किंवा नॅचरल आहे पण प्रत्यक्षात सिन्थेटिक घटक जास्त असतात ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'ममा अर्थ' कंपनीची ओनियन शाम्पूची जाहीरातीमधून नॅचरल हा शब्द काढावा लागला. काही वेळा जाहिरातींमध्ये ते उत्पादन नंबर १ असल्याचे किंवा अतिशयोक्तीचे दावे केलेले असतात.

जानेवारी २०२३ मध्ये या सगळ्यांची दखल घेत Advertising Standards Council of India च्या मार्गदर्शक तत्त्वांबरोबरच केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण (उउझ-) ने इन्फ्लुएन्सर्सना सर्व माहिती, पेड प्रोमोशन असे स्पष्ट प्रगटीकरण करणे बंधनकारक केले आहे तसे न केल्यास ग्राहक संरक्षण कायदा २०१९ अंतर्गत केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण निर्माते, जाहिरातदार आणि अनुमोदक यांना १० लाख रुपयांपर्यंत दंड करू शकते. त्यानंतरच्या गुन्ह्यांसाठी ५० लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. प्रकटीकरण/खुलासे हे सोप्या आणि स्पष्ट भाषेत असले पाहिजेत, अशा कालावधीत असावेत जे सहज लक्षात येतील. लाइव्ह स्ट्रीमही समर्थनांसह चालवले जाणे आवश्यक आहे. प्रकटीकरण हॅशटॅग किंवा लिंक्सच्या गटामध्ये मिसळले जाऊ नये. एखाद्या चित्राच्या अनुमोदनामध्ये, दर्शकांच्या लक्षात येण्याइतपत प्रकटीकरण प्रतिमेच्या वर लावले जावे. व्हीडिओमध्ये, खुलासे केवळ वर्णनात न ठेवता व्हिडिओमध्ये ठेवले पाहिजेत आणि ते ऑडिओ आणि व्हीडिओ दोन्ही स्वरूपात केले जावेत. थोडक्यात 'पी हळद आणि हो गोरी' असे कधीच होत नसते हे मर्म लक्षात घेऊन ग्राहकांनी अधिक सजग असावे हेच खरे !

- नेहा जोशी: मुंबई ग्राहक पंचायत

## शब्दकोडे-१४७



आडवे शब्द -

१. परत परत ३. सतत पक्ष बदलणारे पुढारी ८. पातळ खांब १०. चांदणी ११. सुसर १२. अफवा १३. छोटी ताटली १६. शुभ्र, पांढरा १७. मनातील ओळखणारा १८. अभिनेता १९. कागदावरील स्तंभ २१. --- जाधव- पहिला भारतीय ऑलिंपिक कुस्तीपटू २३. प्रहार २५. क्षणात संपणारे २९. जय-पराजय ३१. चालू वा गत काळ ३२. गुलाम ३३. समतल ३५. सौंदर्यवान ३८. --- युनूस, वसिम अक्रमचा जोडीदार पाकिस्तानी गोलंदाज ४०. घाईघाईने ४२. करुणा, कीव ४४. परीक्षा रत्नाची इ. ४६. फुरसत ४७. धोबी ४९. संघाचा प्रमुख ५०. वाघाची मावशी ५२. घर ५४. एक सोडून एक ५५. एक रंगीत कंदमूळ ५६. वेल ५८. बाराचा समूह (इंग्रजी) ५९. नकला करणारा ६१. पद्धत ६२. बोबडी वळणे ६३. दुर्बोध, कर्नाटकी ६५. गोडी, आवड ६७. तलवार ७०. वैमानिक ७३. पुरुष व स्त्री ७५. मनाचा ओढा ७६. कूस (हिंदी) ७८. बदलणे ७९. जमीनदोस्त ८१. एक मंगल वाद्य ८२. मोठ्या फुगीर शेपटीचा छोटा प्राणी ८३. खर्चात कपात

उभे शब्द -

१. प्राचीन २. तुकारामांना सदेह वैंकुंठाला नेणारे विमान ३. प्रार्थना ४. वनवास भोगणारे दोन दशरथपुत्र ५. नंतर ६. उष्ण ७. राजाची मुलगी ८. संधी ९. शिर्डीचे संत १२. अंदाज, कयास १४. कसा, चंची १५. कोवळा अंकुर २०. चिंता २२. ऐटबाज २४. विहिरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन, तोच तो दिनक्रम २६. तोडणे-मोडणे २७. दुलई २८. ताब्यात ठेवता न येणारे ३०. झाड ३४. पदर ३६. बिल्ला ३७. व्यर्थ ३९. काखेत होणारा गळू ४१. थंड ४३. रंग ४४. झाडाभोवतीचा कट्टा ४५. पुष्कळ ४६. सूट ४८. जन्म ४९. टाळ्यांचा आवाज ५१. अटीची भाषा ५३. गिळंकृत करणे, जबरदस्तीने बळकावणे ५४. चेहरा ५७. घाई, त्वरा ६०. पूर्ण बदल ६३. आजच्या आधीचा दिवस ६४. चिवचिवाट ६६. उंचसखल नसलेले ६८. विष्णुपत्नी ६९. चाम

### शब्दकोडे १४६ चे उत्तर

**आडवे उत्तर-** १.वेतन ४.सुधा ५.सांदिपनी ९.उरका ११.गरजवंत १३.रडारड १५.फक्त १६.राजसूय १९.हावरा २२.गर्क २३.गमन २४.थारा २६.वाळीत टाकणे २८.काडी २९.तारा ३१.धाकटा ३३.वश ३४.फुकट ३६.जाऊ ३९.गोडी ४०.कलंदर ४२.सम ४४.वरकड ४७.उष्ण ४८.केर ५०.दर्या ५१.दल ५२.भूत ५३.गोची ५४.प्रचलित ५७.हवि ५९.लग्न ६०.पार्वती ६१.धमनी ६२.कालिका ६३.सर्व ६४.कपि ६६.चरक ६७.सार ६९.तीज ७१.ठाम ७३.ताठा ७४.काणा ७५.अवस ७७.लढा ७८.दमा ७९.आम्र ८१.धडधडीत ८२.वन ८३.राम ८४.तपास ८५.रबडी ८६.साखरपुडा ८८.स्त्री ८९.तृण ९०.लक्तरे ९१.खासदार

**उभे उत्तर -** १.वेगवेगळी २.तर ३.नजर ४.सुतराम ६.दीर ७.पडाव ८.नीर ९.उफराटा १०.रक्त १२.आसू १४.डहाळी १७.जनता १८.यथा २०.वतन २१.गणेश २३.गडी २५.राधा २६.वाटा २७.कवडी २८.काटक ३०.राजा ३२.कर्ण ३५.उदर ३७.ऊस ३८.शरद ३९.गोड ४१.लंकेची पार्वती ४३.मदत ४५.कलह ४६.हातच्या काकणाला ४९.कच ५४.प्रतीक ५५.लिपी ५६.धमक ५८.विकार ६१.धरती ६५.पिठा ६७.साठा ६८.सवड ७०.जलतरण ७२.मदन ७३.ताम्र ७५.अधर ७६.सधन ७९.आमरस ८०.वपा ८२.वडील ८३.राख ८४.तडाखा ८६.सारे ८७.पौर

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# नाईन पर्ल्स हॉस्पिटलतर्फे नाशिकच्या चामरलेणी परिसरात वृक्षारोपण

**नाशिक । प्रतिनिधी**

'जाणीव एका सामाजिक जबाबदारीची, पर्यावरण जोपासण्यासाठी वृक्षारोपण करण्याची' या संकल्पनेतून नाईन पर्ल्स हॉस्पिटलतर्फे वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

वातावरणात सातत्याने बदल होत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे. पर्यावरणचा प्रश्न सबंध जगाला भेडसावत असल्याने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन ही आज एक काळाची गरज बनली आहे. याच गोष्टीचे भान ठेवून नाशिक येथील नाईन पर्ल्स हॉस्पिटलचे सर्व संचालक, डॉक्टर्स, प्रशासन यांनी नाशिकच्या चामरलेणी परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबवला.



नाईन पर्ल्स हॉस्पिटलचे संचालक व सुप्रसिद्ध कार्डिओलॉजिस्ट डॉ. राजेंद्र देशमुख यांनी पुढाकार घेत हॉस्पिटलमधील सर्व टीमला एकत्र करून तसेच वृक्षवल्ली फाउंडेशन, निर्मल गंगा गोदा बहुउद्देशीय संस्था, नाशिक यांच्या सयुंक्त विद्यमाने ही संकल्पना अमलात आणली. यातूनच चामरलेणी परिसरात १०० हून अधिक वृक्षारोपण केले गेले. याप्रसंगी वृक्षवल्ली फाउंडेशनचे अध्यक्ष सागर शेलार म्हणाले कि, जैवविविधतेचे संतुलन ही काळाची गरज असून, निसर्गाची किमया सर्वानी समजून स्वछ परिसर, हरित परिसर, सुंदर परिसर हि संकल्पना पूर्णत्वास न्यावी. यावेळी सायक्लोथॉनचे अध्यक्ष किशोर माने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

विशेष म्हणजे या ठिकाणी नाईन पर्ल्स हॉस्पिटल मार्फत उपचार घेऊन बरे झालेले रुग्ण व त्यांचे नातेवाईक देखील वृक्षारोपणासाठी उपस्थित होते. यावेळी नाईन पर्ल्स हॉस्पिटलचे सर्व संचालक, डॉ. दिनेश वाघ, डॉ. राजेंद्र देशमुख, डॉ. शीतलकुमार हिरण, डॉ. विनायक शेणगे, डॉ. नागेश अघोर, डॉ. धनंजय डुबेरकर. डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. योगेश चौधरी, डॉ. हुसेन बोहरी व प्रशासन, कर्मचारीवर्ग उपस्थित होता.

## शतायुषी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे डॉ. दिनेश जोशी यांचे व्याख्यान

**नाशिक । प्रतिनिधी**

ज्येष्ठांमध्ये वाढत जाणार्या हर्निया समस्या व वृध्दापकाळातील शौचा संबंधीचे आजार या विषयी ज्येष्ठांमध्ये जनजागृती होण्यासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

राजीवनगर येथील शतायुषी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे नारायणी हॉस्पीटलचे डॉ. दिनेश जोशी यांचे हार्निया व वृध्दापकाळातील शौचासंबंधीचे आजार या विषयावर व्याख्यानाचे आयोजन शनिवार दि.१२ रोजी दुपारी ५ वाजता, शतायुषी ज्येष्ठ नागरिक भवन, राजीवनगर, नाशिक येथे करण्यात आल्याची माहिती संघाचे अध्यक्ष विजय भावे, वेडू सोनवणे, स्वाती बेलदार, सुरेश कांबळे यांनी दिली. या महत्वपूर्ण व्याख्यानाचा लाभ सभासदांसह ज्येष्ठांनी घेण्याचे आवाहन शतायुषी ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यकारिणीने केले आहे.

## अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल येथे लिव्हर, किडनी ट्रान्सप्लांट क्लिनिक सुरू



**नाशिक । वार्ताहर**

उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांना जागतिक दर्जाची आरोग्य सेवा पुरविण्याची अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलची बांधिलकी जपवून या अत्याधुनिक लिव्हर आणि किडनी प्रत्यारोपण क्लिनिकची सुरवात करण्यात आली आहे. अत्यंत कुशल आणि अनुभवी डॉक्टरांची टीम एकत्र आणणे हे या क्लिनिकचे उद्दिष्ट आहे.

मेडिकल डायरेक्टर डॉ. सुशील पारख या प्रसंगी म्हणाले, लिव्हर आणि किडनी ट्रांसप्लांट क्लिनिक सुरु करणे हे आमच्या रुग्णालयाच्या क्षमतांमध्ये मोठी प्रगती दर्शवते. आम्ही आता प्रत्यारोपणची गरज असणाऱ्या रूग्णांसाठी अत्याधुनिक उपचार आणि सुविधा देण्यासाठी सज्ज आहोत.

यावेळी यकृत प्रत्यारोपण शल्यचिकित्सक, डॉ विक्रम राउत म्हणाले, या उपक्रमाचा एक भाग होण्याचा मला सन्मान वाटतो. आमची टीम जागतिक दर्जाच्या यकृत प्रत्यारोपण सेवा देण्यासाठी वचनबद्ध आहे. यकृताच्या आजार असलेल्या रुग्णांना उच्च स्तरावरील काळजी प्रदान प्रत्यारोपणाचे यशस्वी परिणाम आणि आमच्या रुग्णांचे जीवनमान सुधारणे हेच आमचे ध्येय आहे.

डॉ.संदीप सबनीस, सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी मधील तज्ञ, क्लिनिकच्या सर्वांगीण दृष्टिकोनावर भर देत म्हणाले, आमचे क्लिनिक प्रत्यारोपणाच्या प्रक्रियेच्या पलीकडे जाते. आम्ही प्रत्यारोपणापूर्वीचे मूल्यांकन, शस्त्रक्रियेनंतरची काळजी आणि दीर्घकालीन रूग्णांचे आरोग्य यावर लक्ष केंद्रित करतो. यावेळी रिजनल हेड समीर तुळजापूरकर म्हणाले कि, अशोकातील अनुभवी, निष्णात डॉक्टरांची टीम आणि प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ आणि कुशल कर्मचारी यांच्या उपलब्धतेमुळे आणि मेहनतीमुळे लिव्हर व किडनी प्रत्यारोपण सारख्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडतात.

याप्रसंगी कुशल व अनुभवी तज्ज्ञांची टीम गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. तुषार संकलेचा, नेफ्रोलॉजिस्ट डॉ. विपुल गट्टानी, यूरोलॉजिस्ट डॉ. श्याम तलरेज यांच्यासह केंद्र प्रमुख डॉ. सौरभ नागर, मार्केटिंग हेड पियुष नांदेडकर, लिव्हर आणि किडनी ट्रांसप्लांट कोडीनेटर सुरेंद्र तेलंगे, रुग्णालयातील डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी आदी या पत्रकार परिषेदेस मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जागतिक आदिवासी दिनानिमित्त भाजपातर्फे बिरसा मुंडा यांना अभिवादन

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्यावतीने जागतिक आदिवासी दिनानिमित्त बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, माजी नगरसेवक सुरेश खेताडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन साजरा करण्यात आला. यावेळी प्रशांत जाधव यांनी आदिवासी दिनानिमित्त आदिवासी बांधवाना शुभेच्छा दिल्या. भाजपा कार्यालय वसंतस्मृती येथे झालेल्या कार्यक्रमात सरचिटणीस सुनिल केदार, सुनिल देसाई, काशिनाथ शिलेदार, वसंत उशीर, अरुण शेंदुर्णीकर, राकेश पाटील, अभय छल्लाणी, हेमंत शुक्ल, देवेंद्र चुंभळे, विजय कुलकर्णी यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## निलेश आंबेडकर यांची सलग दुसर्यांदा मानव अधिकार आयोगाच्या राष्ट्रीय पुरस्कारावर मोहर

**नाशिक । वार्ताहर**

गाव राष्ट्रीय मानवअधिकार आयोग, भारत सरकार यांनी आयोजित केलेल्या ८व्या राष्ट्रीय लघुपट स्पर्धेत दिग्दर्शक निलेश आंबेडकर यांच्या चिरभोग या मराठी लघुपटाला राष्ट्रीय पुरस्कार आज नवी दिल्ली येथे राष्ट्रीय मानव अधिकार भवन येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात चिरभोगचे दिग्दर्शक निलेश आंबेडकर यांना आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती अरुण मिश्रा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रुपये दोन लाख, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.




यावेळी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर एम. मुळे, श्री. राजीव जैन, सरचिटणीस श्री. भरत लाल आणि महासंचालक (तपास) श्री मनोज यादव हे उपस्थितीत होते. चिरभोग हा एका मुलाचे समाजात जात आणि जातीनिहाय व्यवसायावरून त्याचा होणारा भेदभाव आणि जातीयते मुळे होणाऱ्या मानव अधिकारांच्या उल्लंघणावर प्रकाश टाकतो. या लघुपटाची निर्मिती राहुल सोनावणे आणि निलेश आंबेडकर यांनी केली आहे.

या पुरस्कार प्रदान सोहळ्यात चिरभोगचे सहनिर्माते राहुल सोनवणे, कार्यकारी निर्माता सचिन धारणकर, कलाकार राजविर परदेशी, सोपान भोईर व इतर कलाकार ही उपस्थित होते.

यावेळी या स्पर्धेत एकूण १२३ लघुपट पुरस्कारासाठी रिंगणात होते, त्यातुन चिरभोगने पहिला क्रमांक मिळवत मराठी सिनेमाची मान दिल्लीत उंचावली आहे.

चिरभोग या लघुपटाची कथा निलेश आंबेडकर यांनी लिहिली असून, पटकथा आणि संवाद संजय भारतीय यांनी लिहिले आहेत. राजवीर परदेशी, सुकेशिनी कांबळे, सुशीलकुमार शिर्के, सोपान भोईर, राहुल बनसोडे, सचिन धारणकर आणि राहुल सोनवणे यांनी यात प्रमुख भूमिका केल्या आहेत. विनायक जंगम आणि रोहित गायकवाड यांचे छायाचित्रण, मयूर सातपुते यांचे संकलन, शशिकांत कांबळी यांचे संगीत, श्वेता सवाई यांचे वेशभूषा, श्रद्धा जगदाळे यांचे उपशीर्षक, विकी मोरे यांनी साउंड आणि संदीप रायकर यांचे मेकअप या लघुपटासाठी केला आहे. यात असलेले गीत ज्ञानेश्वरी जमदाडे हिने गायले आहे. गीताचे बोल हे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या अखंड यातून घेण्यात आले आहेत. यासोबतच दिलीप आहेर, सचिन धारणकर, सोपान भोईर, संघमित्रा सोनवणे, यांचे विशेष सहकार्य मिळाले.

निलेश आंबेडकर यांना मागील वर्षी हि त्यांच्या मुंघ्यार या कलाकृतीला राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचा पुरस्कार मिळाला होता. या वर्षी सलग दुसर्यांदा हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## धर्म, संस्कृती, अध्यात्मपासून भाजपासाठी कार्य करणारा कार्यकर्ता म्हणजे लक्ष्मण सावजी

### हभप ज्ञानेश्वर माऊली जळकेकर यांचे प्रतिपादन

**नाशिक । प्रतिनिधी**

भाजप प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी यांचा वाढदिवस विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. भाजप मुख्यालयी वसंतस्मृती येथे आयोजित कार्यक्रमात संतपूजन, आशीर्वचन व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते .जळगाव जिल्हा ग्रामीण अध्यक्ष ह.भ.प.भागवताचार्य ड.ज्ञानेश्वर महाराज जळकेकर शास्त्री यांचे



'धर्माचे पालन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी यावेळी धर्म, संस्कृती, परंपरा, संस्कार, अध्यात्मपासून भाजपासाठी कार्य करणारा कार्यकर्ता म्हणजे लक्ष्मण सावजी असे म्हणत लक्ष्मण सावजी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्यात.

व्यासपीठावर नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, आचार्य तुषार भोसले, हभप संजय धोंडगे, हभप माधवदास महाराज राठी, नाशिक भाजप ग्रामीण अध्यक्ष सुनील बच्छाव, नाशिक लोकसभा समन्वयक व नाशिक महानगर माजी अध्यक्ष गिरीश पालवे, महामंडलेश्वर शिवगिरी महाराज, महामंडलेश्वर गणेशानंद सरस्वती महाराज, महामंडलेश्वर गिरजानंद सरस्वती महाराज, हभप आचार्य तुलसी राम महाराज गुट्टे, हभप मधुकर महाराज शेलार, राहुल महाराज साळुंके, हभप कांचनताई जगताप, उर्मिला सावजी, पूर्वा सावजी, दिनकर पाटील, नाना काशिनाथ शिलेदार, सुनील केदार, सुजाता जोशी, सुजाता करजगीकर, रोहिणी नायडू, अनिल भालेराव, कुणाल वाघ आदी उपस्थित होते. उपस्थित सर्व साधु संत महंतांनी प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी यांच्यावर आपल्या भाषणातून शुभेच्छांचा वर्षाव केला. तसेच भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्र गण, नाशिक शहरातील विविध सामाजिक शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांनी शुभेच्छा दिल्यात. यावेळी सूत्रसंचलन राहुल महाराज साळुंके तर साधू महांतचे स्वागत नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी केले. तत्पूर्वी संत पूजनाच्या सुरवातीला चंद्रशेखर नामपूरकर यांच्या कल्पनेतून रुद्रा फौंडेशन नाशिक आणि लाईफ केअर सुपर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमानाने पसायदान आरोग्याचे समस्या तुमच्या निराकरण आमचे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

## सोनगीरला मोबाईल लंपास

**धुळे ।** ज्येष्ठांमध्ये सोनगीर ता.धुळे येथील महाजन पार्क येथील एका पत्र्याच्या शेडमधून पाच मोबाईल हॅण्डसेट लांबवले. चोरीस गेलेल्या मोबाईल हॅण्डसेटची किंमत ४५ हजार रुपये असल्याचे शाम जगदेव माथो यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## एनसीपीएचा 'कलगीतुरा' प्रेक्षकांना घालणार भुरळ

**मुंबई । वार्ताहर**

भारतीय कलावर्तुळात सन्मानाचे स्थान असलेल्या नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स , मुंबई (एनसीपीए) या संस्थेने २०२२-२३ या वर्षासाठी नुकत्याच आयोजित केलेल्या दर्पण या मराठी नाट्यलेखन उपक्रमातील विजेत्या दत्ता पाटील लिखित व सचिन शिंदे दिग्दर्शित कलगीतुरा या एनसीपीएनिर्मित प्रायोगिक नाटकाचे प्रयोग ऑगस्टपासून धडाक्यात सुरू झाले आहेत. मुंबईतील प्रयोगांनंतर आता २० ऑगस्टला नाशिकमधील शुभारंभाचा प्रयोग कालिदास कलामंदिरात होत आहे, अशी माहिती एनसीपीएचे चित्रपट व नाट्यविभाग प्रमुख ब्रूस गुथ्री व कार्यक्रम विभागाच्या सहव्यवस्थापक तथा कलगीतुराच्या



निर्मात्या राजश्री शिंदे यांनी काल पत्रकार परिषदेत दिली.

कलगी म्हणजे शक्ती, तुरा म्हणजे शिव. म्हणजेच कलगीतुरा. कलगी श्रेष्ठ की तुरा श्रेष्ठ असा शाहिरी गायनातून होणारा हा अनोखा झगडा ही गावची प्रबोधनात्मक करमणूक असायची. शिवाय गावातील एखाद्या घरात कोणाचा मृत्यू झाल्यास रात्रभर त्याकुटुंबाच्या सोबतीला राहणारे, तिथे बसून कलगीतुरा गाणारे त्या दुःखाला राखायला जायचे. पण जसजसे जीवन सुखकर व समृद्ध होऊ लागले तेव्हा जुन्या प्रथा-परंपरा या कालबाह्य वाटू लागल्या. वेगवान जीवनशैलीत जुने मूल्यात्मक तत्व जोपासायला कोणाकडे वेळ आणि इच्छादेखील उरली नाही. परिणामी खेड्यातील कलगीतुरा अस्तंगत झाला. परंतु नेणीवेत कलात्मक मूल्य असलेल्या नव्या तरूणांनी ही दोन दशके लोप पावलेली परंपरा पुनरूज्जिवित केली. आजच्या अस्वस्थ काळात दुःख राखणीला जाणे पुन्हा सुरू झाले. या नाटकात कलगीतुराच्या या पुनरुत्थानाचा संगीतमय प्रवास मांडलाय. यातील सर्व कलावंत व तंत्रज्ञ हे नाशिकचे आहेत. एनसीपीएच्या अतीशय प्रतिष्ठित प्रतिबिंब मराठी नाट्योत्सवाचा शुभारंभ कलगीतुरा या नाटकाने झाला होता.

---

प्रोसेस जमा | ॲड. जगदिश बी. पगारे, धुळे
निशाणी नं.- १०

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. व. स्तर यांचे कोर्टात**

**प्रोबेट अर्ज नं.३/२०२३**

कौशिक नरेश अग्रवाल, वगैरे १ ...**अर्जदार**

**विरुध्द**

कै. नरेश पुरणमल अग्रवाल ...**मयत**

जिया दिपक जैन, वगैरे १ ...**जाबदेणार**

ज्याअर्थी दि.२६/०७/२०२३ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार हे मयत कै. नरेश पुरणमल अग्रवाल यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यांनी अर्जदारांचे लाभात मृत्युपत्रांचे प्रोबेट दाखला मे. कोर्टाकडुन मिळावा म्हणून सदरचा अर्ज धुळे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता चौकशी तारीख २८/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद, हरकत असल्याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो.व.स्तर क्रमाक २ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदरकामी कोणाचीही, काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. न्यायालयाचे सही-शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : १० /०८/२०२३ आदेशावरुन

**कनिष्ठ लिपीक** (शिक्का) **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे** **दिवाणी न्यायालय, व. स्तर, धुळे**

## न्यूज कॉलम

### कवी ना. धों. महानोर यांना निसर्गमित्र समितीतर्फे श्रद्धांजली

**धुळे ।** प्रख्यात निसर्गकवी ना. धों. महानोर यांना येथील निसर्गमित्र समितीतर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. समितीच्या वलवाडी येथील कार्यालयात श्रद्धांजलीचा कार्यक्रम झाला. समितीचे संस्थापक अध्यक्ष प्रेमकुमार अहिरे, धुळे जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य आर. ए. पाटील, जिल्हा उपाध्यक्ष गोकुळ पाटील, पारोळा तालुकाध्यक्ष तथा शिवव्याख्याते प्रेमचंद अहिरराव, धुळे शहर संपर्कप्रमुख वैभव पाटील, कांतिलाल देवरे, कृष्णा शिंदे, आर. टी. अहिरे, आदर्श शिक्षक सुनील पाटील, निसर्ग अहिरे, अक्षय पवार आदी उपस्थित होते.

### एसएसव्हीपीएस महाविद्यालयात व्याख्यान

**धुळे ।** श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य आणि मु.फि.मु. अ. वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे मेरी मिट्टी मेरा देश अभियान, क्रांती दिवस व जागतिक आदिवासी दिनानिमित्त व्याख्यान झाले. प्राचार्य डॉ. मनोहर पाटील अध्यक्षस्थानी होते. आदिवासी जननायक बिरसा मुंडा व साने गुरुजी यांच्या प्रतिमांचे पूजन झाले. प्राचार्य डॉ. पाटील, जिल्हा युवा अधिकारी अशोक मेघवाल, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य डॉ. मोहन पावरा, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. प्रमोद पाटील, डॉ. अभयकुमार खैरनार,डॉ. सदाशिव सूर्यवंशी उपस्थित होते.

## हस्ती स्कूल तर्फे स्व.शांतीलालजीजैन जयंती निमित्त

# गुणवंत विद्यार्थ्यांसाठीचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात संपन्न



**दोंडाईचा । प्रतिनिधी**

हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत, हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज दोंडाईचा तर्फे दि. १० ऑगष्ट २०२३ गुरूवार रोजी दृढधर्मी व दानशूर व्यक्तिमत्व स्व. पप्पाजी शांतीलालजी हस्तीमलजी जैन यांच्या ८३ व्या. जयंती निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचा पारितोषिक वितरणाचा दिमाखदार सोहळा शालेत समिती चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शनाने उत्साहात संपन्न झाला.

सदर सोहळ्याच्या सुरूवातीला स्व. पप्पाजी शांतीलालजी जैन यांचे प्रतिमेचे पूजन करून; त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सन्माननीय मम्मीजी लिलावतीजी जैन, सुषमाजी जैन, सुगंधाजी जैन, शितलजी जैन तसेच मनिषा अग्रवाल, नुतन घरटे, डॉ. दिनेश भामरे, हितेंद्र गुजराथी, हेमंत भावसार आणि प्राचार्य हरिकृष्ण निगम, प्राचार्य गोविंद गांगुर्डे, मुख्याध्यापक सदाशिव महाजन व पालक शिक्षक संघ सदस्य हे मान्यवर उपस्थित होते. सदर सोहळ्यात हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेजच्या इ. १ ली. ते इ. १२ वी. च्या विद्यार्थ्यांसाठी १६० पारितोषिके व हस्ती वर्ल्ड स्कूलचे इ. १ ली. ८ वी. च्या विद्यार्थ्यांसाठी १०६ पारितोषिके आणि हस्ती गुरूकुल शाळेच्या इ. १ ली. ते इ. ६ वी. च्या विद्यार्थ्यांसाठी ५६ पारितोषिके; असे एकुण ३२२ पारितोषिके गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रशस्तीपत्र प्रदान करून कौतुक करण्यात आले. यावेळी पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांनी पारितोषिकांचा आनंदात स्विकार केला. एवढ्या मोठ्या संख्येने पारितोषिक प्रदान करून; विद्यार्थ्यांचे कौतुक करणारी ' हस्ती स्कूल ' ही जिल्ह्यातील एकमेव शाळा असावी.

यात ' सर्वोत्कृष्ट स्काउट व गाइड अवॉर्ड ' आणि ' कब व बुलबुल अवॉर्ड ', ' संपूर्ण वर्षातील १००% अटेन्डन्स अवॉर्ड ', ' मोस्ट अटेन्डन्स अवॉर्ड ', ' एक्सलन्स अवॉर्ड इन कॉम्पिटिटीव्ह एक्झाम ', वर्ग निहाय इंग्रजी, हिंदी, मराठी, समाजशास्त्र, गणित, विज्ञान, संगणक व जनरल नॉलेज या ८ विषयांमधील ' एक्सलन्स अवॉर्ड ', ' क्लास टॉपर अवॉर्ड ', ' सुपर स्पोर्टस् बॉय अवॉर्ड ', ' सुपर स्पोर्टस् गर्ल् अवॉर्ड ' व ' स्टुडंट ऑफ द इयर अवॉर्ड ' अशा शालेय शिक्षणाच्या विविध क्षेत्रातील तब्बल १७ अवॉर्डांचा समावेश होता. वरील अवॉर्डस करिता हस्ती परिवार के. एस. गृप दोंडाईचा तर्फे स्व. दादाजी हस्तीमलजी जैन, स्व. पप्पाजी शांतीलालजी जैन व स्व. काकाजी कांतीलालजी जैन यांचे स्मरणार्थ प्रायोजकत्व स्विकारले. तसेच महेश शांतीलालजी छाजेड - सी. ए. - अहमदाबाद, राजन हिरालालजी जैन - सी.ए. - दिल्ली आणि गरिमा व मयंक नवीनजी जैन - दिल्ली आणि डॉ. विजयजी नामजोशी, हितेंद्र गुजराथी या मान्यवरांनीही रोख पारितोषिकांसाठी प्रायोजकत्व स्विकारले. सोबतच मागील शैक्षणिक वर्षी क्रीडा शिक्षक, स्काउट गाइड शिक्षक व कला शिक्षक यांनी आपल्या क्षेत्रात विभागीय तसेच राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. अशा शिक्षकांचाही शाळेतर्फे रोख पारितोषिके प्रदान करून; त्यांचाही सन्मान करण्यात आला. तब्बल दोन तास चाललेल्या पारितोषिक वितरणाचा कौतुक सोहळ्यास बहुसंख्येने शिक्षक आणि विद्यार्थी व पालक बहुसंख्येने उपस्थित होते. वरील सोहळा यशस्वी होण्यासाठी उप - प्राचार्या रजिया दाउदी व समन्वयक मनोज ठाकुर, श्रीराम मगर, समिना बोहरी तसेच शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

# कारभारी दादा शिवार प्रतिष्ठान ठरतेय राज्यातील बळीराजासाठी विद्यापीठ

### पंचवीस एकरात फुलले लाल सोने : शिवारफेरी, चर्चासत्रास प्रतिसाद



**शेतकऱ्यांनी आता टेक्नोसॅव्ही होण्याची गरज आहे. सोशल मीडियावर चांगले शेतकरी मित्र जोडले तर लागवड, पिकांची चर्चा करता येते. विविध विभागांतील परिस्थितीची जाणीव यातून करून घेता येते. एकमेकांना शेती विषयी महत्वाचे माहिती अदान प्रदान केल्यास चांगला फायदा होइल. - हरिभाऊ गिते, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, नाशिक**

**नाशिक । प्रतिनिधी**

अचूक नियोजन, सातत्य, नवीन तंत्रज्ञान आणि बाजाराचा अभ्यास करून टोमॅटो लागवड केली. तर द्राक्षानंतर टोमॅटो हे मुबलक आर्थिक उत्पन्न मिळवून देणारे पीक असल्याचा विश्वास २५ एकरांतील टोमॅटो पिकाच्या शिवार फेरीत शेतकऱ्यांना निर्माण झाला. दरम्यान राज्यभरातील विविध ठिकाणचे शेतकरी या ठिकाणी मार्ग दर्शन घेण्यासाठी येत आहेत.

कारभारी दादा शिवार प्रतिष्ठानतर्फे सोनोशी येथे टोमॅटो पिकावरील चर्चासत्र, शिवार फेरी आणि शेतकरी संवाद यात्रेसाठी नाशिक, अहमदनगर, पुणे आणि संभाजीनगरसह इतर जिल्ह्यांतील अनेक तालुक्यांतील शेतकरी बांधव उपस्थित होते. यानिमित्ताने टोमॅटो उत्पादक शेतकरी, कृषी संशोधक, कृषी अधिकारी, दुकानदार यांना एकाच बांधावर एकत्र आणून शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान करण्यात आले.राहुरी कृषी विद्यापीठाचे भाजीपाला रोगशास्त्रज्ञ डॉ. बी. टी. पाटील यांनी भाजीपाला पैदास विषयावर, तर कीटकशास्त्रज्ञ प्रा. एस. ए. पवार यांनी मार्गदर्शन केले. पुणे येथील टोमॅटो एक्स्पर्ट प्रतीक मोरे यांनी अनेक विषय शेतकऱ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितले. यावेळी राजेंद्र सानप, किसनराव सुपेकर, मोहन काकड, विठ्ठल सानप, पुंजाजी सानप आदी मान्यवरांसह बी. एन. फड, शिवाजी आवटे, महेंद्र निकम, राहुल वाबळे, योगेश गोरे, कैलास पगार, गौरव ठोक आदी शेतकरी उपस्थित होते. गणेश नाझिरकर आणि अजित कोरडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एल. के. गिते यांनी आभार मानले.

# उंटावद येथील कृषी दुत्तांकडून मेरी मिट्टी मेरा देश या कार्यक्रमांतर्गत रॅली



**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील उंटावद येथे काढण्यात आलेल्या आझादी का अमृतमहोत्सव कार्यक्रम समारोप उपक्रमाअंतर्गत मेरी मिट्टी मेरा देश अभियान राबविण्यात आले.

याप्रसंगी काढण्यात आलेल्या रैलीमध्ये कृषी महाविद्यालय ( दोंडाईचा ) येथील अंतिम वर्षाचे कृषिदुत अनिकेत साळुंके, प्रसाद सैंदाणे, योगेश पाटील, दर्शन सैद, सतिश साबळे आणि रोहन राऊत सहभागी झाले. राज्यात ग्रामपंचायत, तालुकास्तर, जिल्हास्तरावर विविध उपक्रम त्यानिमित्त आयोजित केले जात आहेत. देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि नमन करण्यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. याप्रसंगी गावाचे विद्यमान सरपंच शरद कुंवर तसेच उपसरपंच राजकपूर मराठे, ग्रामविकास अधिकारी देवरे व गावातील पंचक्रोशीतील नागरिकांनी कार्यक्रमात सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. आर. बी. राजपूत सर, उपप्राचार्य आर.बी.पाटील सर तसेच कार्यक्रम समन्वयक डॉ. विवेक चव्हाण सर व कार्यक्रम अधिकारी प्रा. इंद्रजीत गिरासे सर व प्रा. शरद भोपळे सर यांचे मार्गदर्शन लाभले.

# सी. पटेल फार्मसी महाविद्यालयात राजमाता जिजाऊ युवती स्व-संरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम



**शिरपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग आणि आर. सी. पटेल इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन आणि रिसर्च शिरपूर आयोजित तिन दिवसीय राजमाता जिजाऊ युवती स्व-संरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.

महिला व बाल विकास अधिकारी सचिन शिंदे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जे. सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिरपूर शहर पोलीस निरीक्षक अंसाराम आगरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उदघाटन दि. २० जुलै २०२३ रोजी एस. एम. पटेल ऑडिटोरियम हॉल मध्ये शिरपूर पोलीस निरीक्षक अंसाराम आगरकर यांच्या हस्ते तसेच आय. एम. आर. डी. संचालिका डॉ. वैशाली पाटील, प्राचार्य डॉ. संजयकुमार बारी (एच. आर. पटेल फार्मसी कॉलेज शिरपूर), उपप्राचार्य डॉ. ए. ए. शिरखेडकर (आर. सी. पटेल फार्मसी कॉलेज शिरपूर), उपप्राचार्य डॉ. ए. एम. पाटील (आर. सी. पटेल सिनिअर कॉलेज शिरपूर), उपप्राचार्य डॉ. गजानन पाटील (एच. आर. पटेल महिला कॉलेज शिरपूर), सिनेट सदस्य अमोल सोनवणे, योगेश जाधव (संरक्षण अधिकारी, शिरपूर महिला व बाल विकास विभाग), वैभव सोनार (विस्तार अधिकारी, शिरपूर महिला व बाल विकास विभाग) यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. डॉ. हर्षदा पाटील व प्रा. मानसी वैद्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

कार्यशाळेत आय.एम.आर. डी. कॉलेज, आर.सी.पटेल फार्मसी कॉलेज, एच.आर.पटेल फार्मसी कॉलेज, आर. सी. पटेल सिनिअर कॉलेज, एच.आर. पटेल महिला कॉलेज चे एकूण ४०० हून अधिक विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले आणि हे प्रशिक्षण खूप महत्वाचे असल्याचे स्पष्ट केले.

# देवरे अभियांत्रिकीच्या एकशे पंचावन्न विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंट द्वारे नोकरी

**धुळे । प्रतिनिधी**

दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षणासाठी व उत्कृष्ट कॅम्पस प्लेसमेंट साठी सुपरिचित असलेल्या खान्देशातील अग्रगण्य श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील २०२२-२३ शैक्षणिक वर्षांतील एकशे पंचावन्न विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध नामवंत कंपन्यां मध्ये कॅम्पस प्लेसमेंट द्वारे आकर्षक वेतन पॅकेज वर नोकरी ची संधी मिळाली आहे.

संगणक, ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स, ईलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल व सिव्हिल इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थ्यांना टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस ( टीसीएस ), विप्रो टेक्नॉलॉजी, रिलायन्स जियो, बायजूस, डेलाईट, प्राशन टेक्नॉलॉजी प्रा लि, क्रॅव्हीटा टेक्नॉलॉजी पुणे, इव्हीगो चार्जिंग, पदावर कॅम्पस प्लेसमेंट प्रक्रिये द्वारे नोकरी ची संधी मिळाली असून सर्व अभियंते नियुक्ती च्या ठिकाणी आपापल्या कामावर हजर झाले आहेत. गत पाच वर्षांत बाराशेहून अधिक विद्यार्थ्यांना महाविद्यालया मार्फत कॅम्पस प्लेसमेंट द्वारे नोकरी च्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. सर्व नवनियुक्त अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा आ बाबा साहेब कुणाल पाटील, महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे, प्राचार्य डॉ हितेंद्र पाटील व महाविद्यालयाचे ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा प्रसाद विंचूरकर यांनी अभिनंदन केले आहे. तसेच यशस्वी विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख प्रा भालचंद्र मांडरे, प्रा डॉ एस डी सूर्यवंशी, प्रा डॉ एस के दुबे, तसेच विविध विभागातील विषय शिक्षकांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

# जवाहर मेडीकलची ग्रामीण भागापर्यंत आरोग्य सेवा

### दह्याणे येथे आदिवासी दिनी मोफत आरोग्य शिबीर

**धुळे । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील गोरगरीब-सर्वसामान्य रुग्णांना थेट आपल्या गावात आरोग्य सेवा मिळावी म्हणून जवाहर मेडीकल फाउंडेशनचे आण्णासाहेब चुडामण पाटील मेडीकल कॉलेज आणि रुग्णालयाच्यावतीने दह्याणे ता.धुळे येथे आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. आदिवासी दिवस आणि क्रांती दिनाचे औचित्य साधुन आरोग्य शिबीर घेण्यात आले. शिबीरात दह्याणे येथील ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दि.९ ऑगस्ट रोजी आदिवासी दिवस आणि क्रांती दिनाचे औचित्य साधून धुळे तालुक्यातील दह्याणे येथे जवाहर मेडीकल फाउंडेशन संचलित ए.सी.पी.एम.मेडीकल कॉलेज आणि रुग्णालय मोराणे प्र.ल.धुळेतर्फे मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्याअनुषंगाने दह्याणे येथे आयोजित शिबीरात विविध आजारांवर रुग्णांची तपासणी करण्यात आली. यावेळी जवाहर मेडीकल फाउंडेशनच्या वैद्यकीय पथकाने गरजेनुसार रुग्णांवर शिबीरस्थळी उपचार करुन औषधोपचार केले. तर ज्या रुग्णांना शस्त्रक्रीया अथवा इतर महत्वाच्या तपासणीची गरज असेल अशा रुग्णांना जवाहर मेडीकल फाउंडेशन मोराणे प्र.ल.येथे बोलविण्यात आले आहे. आरोग्य शिबीराला ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जवाहर मेडीकल फाउंडेशन संचलित ए.सी. पी.एम.मेडीकल कॉलेज आणि रुग्णालय मोराणे प्र.ल.धुळे चेअरमन आ.कुणाल पाटील, सचिव डॉ.ममताताई पाटील,सहसचिव संगिता पाटील यांच्या संकल्पनेतून मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीरात डॉ.पंकज कुमार गुप्ता, डॉ.भुमिका,डॉ.हर्षाली, डॉ. किरण, डॉ.केतकी यांनी रुग्णांवर तपासणी व उपचार केले. शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी सरपंच सौ.अलकाताई राजपूत,उपसरपंच रोहिदास पवार, गोलू पाटील, गोकुळ पाटील, लालचंद वाघ, दयाराम माळी, रोहिदास पवार,बारकु भिल, भैय्या गायकवाड,भिमा मोरे, सुरेश मोरे,मुरलिधर मोरे, रामभाऊ मोरे, सुकराम भिल,जयसिंग भिल, छोटू मोरे, श्रावण माळी, बंडू सोनवणे,दशरथ पवार, समाधान वाघ, नाना ठाकरे, छबू ठाकरे, बंडू मोरे, पिंटू मोरे, देवा सोनवणे, सुरेश सोनवणे, मच्छिंद्र पाटील, प्रविण राजपूत यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# कुंडाणे येथे माझी माती माझा देश उपक्रम



**धुळे । प्रतिनिधी**

सैनिकांनी देशासाठी दिलेले बलिदान कोणीही विसरू शकत नाही, म्हणुनच स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव कार्यक्रमाची सांगता करतांना माझी माती माझा देश हा उपक्रम कौतुकास्पद अश्या भावना कुंडाणे येथे मान्यवरांची कार्यक्रमाच्या वेळी व्यक्त केल्या.

स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागावर आपली प्रगतीची इमारत उभी आहे. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सर्वस्व अर्पण केल्यामुळे देश स्वतंत्र झाला. सैनिकांनी देशासाठी दिलेले बलिदान कोणीही विसरू शकत नाही, म्हणुनच स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव कार्यक्रमाची सांगता करतांना माझी माती माझा देश हा उपक्रम कौतुकास्पद ठरला आहे, अशी भावना मान्यवरांनी व्यक्त केली. धुळे तालुनयातील कुंडाणे येथे माझी माती माझा देश या उपक्रमांतर्गत गुरूवारी कार्यक्रम झाला. यात स्वातंत्र्य लढ्यातील महापुरुषांना आणि वीरांना वंदन करून शपथ घेण्यात आली. माती कलशात भरून पुजन करण्यात आले. शिलाफलक अनावरण, वृक्षारोपणासह ध्वजारोहनाचा कार्यक्रम सैन्य दलातील जवानांच्या हस्ते झाला.

याप्रसंगी ग्रामपंचायतीच्या सत्ताधारी गटाचे पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव कार्यक्रमाची १५ ऑगस्टला सांगता होणार आहे. यापार्श्वभुमीवर शासनातर्फे माझी माती माझा देश हा उप्रकम राबविण्यात येत आहे. धुळे तालुनयातील कुंडाणे जिल्हा परिषद शाळेत आवारात माझी माती माझा देश या कार्यक्रमाला सुरूवात झाली. कुंडाणे येथील सैन्य दलात कार्यरत असलेले निलेश पाटील, विकास चव्हाण, तेजस चव्हाण यांच्या हस्ते शिलाफलक अनावरण, वृक्षारोपण, ध्वजारोहनाचा कार्यक्रम झाला. यानंतर उपस्थित अधिकारी कर्मचा-यांच्या उपस्थितीत माती कलशात भरून पुजन करण्यात आले. स्वातंत्र्य लढ्यातील महापुरुषांना आणि वीरांना वंदन करून शपथ घेण्यात आली. तसेच सैन्य दलात कार्यरत असलेल्या सैनिकांचा कुंडाणे ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विस्तार अधिकारी भिमराव गरूड, शाखा अभियंता महेंद्र पाटील, ग्रामपंचायतीच्या सत्ताधारी गटाचे समन्वयक अमोल सिसोदे, उपसरपंच सुनील मोरे, डॉ. प्रविण शिंगाणे, ग्रामसेवक आर.ए.पाटील, धुळे टिव्हीचे उपसंपादक योगेश पाटील, मुख्याध्यापक कैलास पवार, प्राध्यापिका वैशाली पाटील, मुख्याध्यापिका कांचन सैदाणे, उपशिक्षक रविंद्र सैंदाणे, शिक्षिका कविता फटकाळ, अनिता सुतार, कामिनी घुगे यांच्यासह ग्रामस्थ, अंगणवाडी शिक्षिका, मदतनीस उपस्थित होते. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागावर आपली प्रगतीची इमारत उभी आहे. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सर्वस्व अर्पण केल्यामुळे देश स्वतंत्र झाला. सैनिकांचे देशासाठी बलिदान कोणीही विसरू शकत नाही, म्हणुनच स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव कार्यक्रमाची सांगता करतांना माझी माती माझा देश हा उपक्रम कौतुकास्पद ठरला आहे, अशी भावना कुंडाणे ग्रामपंचयतीच्या सत्ताधारी गटाचे अमोल सिसोदे यांनी व्यक्त केली.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK
दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# शिंदखेडा येथे निघाली १११ फूट तिरंगा ध्वजाची भव्य रॅली











शिंदखेडा । स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सांगता सोहळ्यानिमित्त राज्यात 'मेरी माटी मेरा देश'अर्थात 'माझी माती माझा देश' केंद्र सरकारच्या सूचनेनुसार हे अभियान राबवण्यात येत आहे.आज सकाळी नगरपंचायत च्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. नगरपंचायत चे प्रशासक प्रशांत बिडगर यांनी ध्वजारोहणाचा मान नुकतेच सेवानिवृत्त झालेले सैनिक प्रवीण नथू बडगुजर यांना दिला.त्यानंतर स्थानिक शूरवीरांच्या त्यागाला वंदन करणारे शिलाफलकाचे अनावरण करण्यात आले सदर शीलाफलकाचे अनावरण वीरमाता श्रीमती कमलबाई परदेशी,श्रीमती भिमाबाई अहिरे,श्रीमती देवकाबाई मोरे तसेच शिंदखेडा शहरातील प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा रजनीताई वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले. पुढे नगरपंचायत सभागृहात स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक,वीरमाता यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला.सत्कार समारंभाची सुरुवात झंडा ऊँचा रहे हमारा या गीताने करण्यात आली.गुलामगिरीची मानसिकता मुळापासून उखडून टाकायची आहे.देशाच्या समृद्ध वारशाचा अभिमान बाळगायचा आहे.एकता आणि एकजुटता यासाठी कर्तव्यदक्ष राहायचं आहे.तसेच देशाचे रक्षण करणाऱ्यांचा आदर ठेवायचा आहे',ही पंचप्राण शपथ हातात दिवे घेऊन कार्यक्रमास उपस्थित सर्व नागरिकांनी घेतली.कार्यक्रमात पुढे नगरपंचायत येथून भव्य अशी तिरंगा रॅली काढण्यात आली १११ फुटाचा तिरंगा ध्वजाने नगरपंचायत येथून रॅलीला सुरुवात करत हँडल चौक गांधी चौक कचेरी चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून रॅली वळवून भगवा चौक पर्यंत रॅली काढण्यात आली. ठिकठिकाणी रॅलीत तिरंगा ध्वजावर फुलांचा वर्षाव करण्यात आला.भगवा चौक येथे राष्ट्रगीताने रॅलीची सांगता करण्यात आली. कार्यक्रमात पुढे वसुधा चंदन कार्यक्रमांतर्गत देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण झाल्या निमित्ताने ७५ देशी वृक्षांचे रोपण करून अमृत वाटिका तयार करण्यात आली.प्रसंगी प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ.रजनीताई वानखेडे,गटनेते अनिल वानखेडे,प्रशासक प्रशांत बिडगर, सुरेश देसले,माजी नगरसेवक उल्हास देशमुख,माजी नगरसेवक सुनील चौधरी,बचत गट च्या महिला पदाधिकारी,वृक्ष संवर्धन समिती शिंदखेडा,खानदेश रक्षक ग्रुप तालुका शिंदखेडा,पत्रकार बंधु नगरपंचायत चे कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# भाजपातर्फे क्रांतीदिनानिमित्त शहीद स्मारकावर अभिवादन










धुळे । भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षपुर्ती निमित्ताने देशभरात भारतीय जनता पक्षाकडून 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' आयोजित करण्यात येत असून त्या अनुषंगाने 'मेरी मिट्टी मेरा देश' अभियानांतर्गत शहिद अब्दुल हमीद स्मारक, शिवतीर्थ धुळे येथे शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमा प्रसंगी भाजपा धुळे (महानगर) जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, महापौर सौ. प्रतिभाताई चौधरी, भाजपाचे धुळे लोकसभा संयोजक तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, प्रदेश पदाधिकारी हिरामण गवळी, रवी बेलपाठक, महेश मुळे, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रदीप कर्पे, माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर, जयश्री अहिरराव ,वैशालीताई शिरसाट, सुनीता सोनार, सुनील बैसाने, बंटी मासुळे, राजेश पवार, संदीप अग्रवाल, डॉ. महेश घुगरी, राजेंद्र खंडेलवाल, संजय बोरसे, हेमंत मराठे, विजय पाश्चापुरकर, विनोद थोरात, बिपीनचंद रोकडे, भागवत चितळकर, सुबोध पाटील, राकेश कुलेवार, पंकज धात्रक, जयेश वावदे, प्रथमेश गांधी, श्याम पाटील, अनिल थोरात, मनोज शिरुडे, किरण देशमुख, सचिन शेवतकर, अमित खोपडे, प्रदीप पानपाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमा दरम्यान सुरुवातीला उपस्थित मान्यवरांकडून शहिद अब्दुल हमीद यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास माल्यार्पणासह विनम्र अभिवादन करण्यात आले. तद्नंतर सर्व उपस्थितांनी आपआपल्या हातात मेणबत्या प्रज्वलित करून देशासाठी स्व-प्राणांचे बलिदान देणार्या शहिदांचे स्मरण करून ह्या वीरांप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली.

संकलन : दिपक वाघ